# प्रकरण २ रे

## नीलम माणगावे यांच्या वाङ्मयीन कामगिरीचा परामर्श

जन्म व बालपण

आवड - निवड

शैक्षणिक वातावरण

जीवनातील महत्त्वाच्या घटना

भावलेल्या व्यक्ती

वैवाहिक जीवन

सामाजिक कार्यातील योगदान

वाङ्मयीन कामगिरी

कथाविश्व

कादंबरी लेखन

आत्मकथन

काव्यलेखन

लोकसाहित्य

बालसाहित्य

मिळालेले पुरस्कार

समारोप

# प्रकरण २ रे

## नीलम माणगावे यांच्या वाङ्मयीन कामगिरीचा परामर्श

लेखक ज्या समाजात राहतो त्या समाजाचा तेथील व भोवतालच्या परिसराचा त्याच्यावर नकळत परिणाम होत असतो. कुटुंब, शेजारी, नातेवाईक यांच्याबरोबर जीवन जगत असताना त्याला बरे वाईट अनुभव येत असतात. चांगल्या वाईट प्रवृत्तीची माणसे भेटत असतात. त्यातूनच लेखकाचे व्यक्तिमत्त्व घडत असते. लेखकाच्या जीवन विषयक दृष्टिकोन बनत असते. बालपणी झालेले संस्कार मनुष्य कधी विसरत नाही. व्यक्तिचे बालपण कसे गेले यावर त्याच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण अवलंबून असते.

लेखक भोवतालच्या सामाजिक परिस्थितीकडे सूक्ष्म नजरेने पाहतो. सामान्य लोकांना जे दिसत नाही, पाहता येत नाही ते तो पाहतो व आपल्या साहित्यातून ते व्यक्त करत असतो. त्यासाठी लेखक कथा, कादंबरी, कविता इ. साहित्य प्रकाराचा आधार घेतो. नीलम माणगांवे यांनी माणसाचे जीवन, त्यांच्या प्रवृत्ती कशा असतात हे अनेक माणसांच्या जीवनाकडे पाहून अनुभवले. काना, मना, नयनांनी पाहिले व शब्दबद्ध केले. दुसऱ्या प्रकरणामध्ये त्यांच्या जीवन परिचयाबरोबरच वाङ्मयीन कामगिरीचा परामर्श घेणे योग्य ठरेल.

नीलम माणगावे यांचा जन्म, बालपण कसे गेले? त्यांची आवड-निवड, त्यांच्या जीवनात घडलेल्या महत्त्वाच्या घटना, शैक्षणिक वातावरण, त्यांच्या मनाला भावलेल्या व्यक्ती, वैवाहिक जीवन, कार्य या मुद्द्यांच्या अनुषंगाने त्यांच्या जीवनाचा थोडक्यात परिचय करून घेऊन नंतर त्यांच्या वाङ्मयीन कामगिरीकडे वळावयाचे आहे.

### जन्म व बालपण

नीलम माणगावे यांचा जन्म ०१ मे १९५४ रोजी सांगोडा, ता. करवीर, जि. कोल्हापूर येथे झाला. त्यांच्या आईचे नाव रत्नाबाई व वडिलांचे नाव रायगोंडा होते. त्यांचे शाळेतील नाव ताराबाई रायगोंडा पाटील असे होते. घरी सर्वजण त्यांना माणिक म्हणून संबोधत असत. नीलम माणगावे तीन महिन्याच्या असताना त्यांचे वडील आपल्या कुटुंबासह

रुकडीला आले. त्यामुळे त्यांचे बालपण 'रूकडी', ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथे गेले. त्यांचे बालपण अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत गेले आहे. त्यांचे वडील स्वार्थी, रागीट, बेजबाबदार वृत्तीचे होते. ते कधीही कष्ट करत नसत. तरीही चैन, ऐश करत असत. त्यांनी आपली पहिली पत्नी वारल्याने रत्नाबाईंशी विवाह केला होता. पहिल्या पत्नीच्या आईचा त्यांनी मित्रांकरवी खून करविला होता. त्यांची दोन वर्षांची शिक्षादेखील त्यांनी भोगलेली होती. त्यांनी आपल्या बायकोवर, मुलींवर कधीही प्रेम केले नाही. त्यामुळे वडिलांचे प्रेम काय असते हे नीलमबाईंना ठाऊक नाही. चौथीत असताना इ. स. १९६३ साली त्यांचे वडील वारले.

आई प्रेमळ, सोशिक, कष्टाळू, परोपकारी वृत्तीची, आपल्या पिल्लांना पंखाखाली घेऊन जपणारी होती. घरात कोणीही पुरुष नसल्याने आईला खूप त्रास झाला. एका विधवेचं जगणं कसं कष्टदायक, दुःखाने भरलेलं असतं, समाज तिच्याशी कसं वागतो हे त्यांनी अत्यंत जवळून पाहिलं आहे. त्याचमुळे त्यांच्या लेखनात विधवेचं दुःख आलेलं दिसतं.

नीलम माणगावे यांचे वडील वारल्यानंतर त्यांच्या अंगणात त्यांना खेळायला मिळाले नाही. तिसरी, चौथी, पाचवीच्या मैत्रिणी अंगणात तरुण मुलं नसताना खेळत असत. पळापळी, हर हर गवळी, खो-खो, लपाछपी इ. खेळ त्या खेळत असत. लपाछपी खेळत असताना मोठं परडं, घरातला लांबलचक गोठा, जिन्याखालची अंधारी खोली इ. ठिकाणी त्या लपत असत. पण नंतर नंतर त्या ठिकाणी मोठी मुलं लपून बसत व लपायला येणाऱ्या मुलींबरोबर अश्लिल चाळे करत असत. त्यामुळे त्यांचे खेळणेही बंद झाले. माणगावे म्हणतात, ''बालपणातल्या साध्या साध्या गोष्टींसाठीसुद्धा आम्हाला मन मारावं लागलं होतं. आम्हाला मनमोकळं जगताच आलं नव्हतं. पंख असून उडता येऊ नये, चोच असून पुढ्यातले दाणे टिपता येऊ नयेत, अशी आमची त्यावेळी परिस्थिती होती.''[१] तालमीतली मुलं नेहमी अंगणातच वावरत असत. अंगणात खेळणे, दंगा घालणे, आरडाओरडा करुन धुमाकूळ घालणे, अचकट विचकट बोलणे, दरवाजावर दगड, शेण मारणे असे प्रकार करत असत. आई व बहिणी या प्रकाराने भेदरुन जात, घाबरून दरवाजा बंद करून आतमध्ये

गुपचुप बसत. माणगावेदेखील या प्रकारांनी घाबरून जात असत. बालपणीच्या अशा कटू अनुभवांमुळेच बहिणी भित्र्या बनल्या, आई सहनशील, मनाने कणखर, श्रद्धाळू बनली. नीलम मात्र लहान असल्याने हे असं का घडतंय? मुलं अशी का वागतात? हे समजत नसे. पण जे घडतंय ते भयंकर आहे; विचित्र आहे, आपल्या आईला त्रास देणारं आहे, एवढं समजत असे. अशा वातावरणात त्यांचं बालपण जात होतं. हसण्या खेळण्याच्या, बागडण्याच्या वयात त्यांना असे विचित्र अुभव येत होते.

**आवड-निवड**

नीलम माणगावे यांना बालपणापासून वेगळं, नवं काहीतरी करण्याची आवड होती. एकदा त्यांच्या घरी सरकारने कुंभारकाम प्रशिक्षण शिबिर घेतले होते. तेव्हा चाकावरती चिखलाचा गोळा ठेवून मडकी बनवण्याचा प्रयत्न त्यांनी केला होता. शाहीर 'कुंतिनाथ करकेंचा' पोवाडा ऐकायला त्यांना आवडत असे. तसेच त्यांना सिनेमा पहायला आवडत असे. त्या कधी कधी मैत्रिणींच्याबरोबर चोरून सिनेमा पहायला जात. त्यांना सिनेमाचे चित्रीकरण पहायला आवडत नसे. त्यांचे भावोजी बाहुबली शिक्षण संस्थेत शिक्षक होते. ते पेपरच्या गुणांची बेरीज करायला सांगत. हे काम त्या आवडीने करत असत. त्यांना वाचनाची आवड होती. विद्यार्थी दशेत असताना त्यांनी साने गुरुजी, बाबुराव अर्नाळकरांची पुस्तके वाचली. अलीकडच्या काळात कमल देसाई, शंकरराव खरात हे त्यांना आवडणारे लेखक आहेत.

**शैक्षणिक वातावरण**

नीलम माणगावे त्यांच्या दोन्ही बहिणींपेक्षा जास्त शिकल्या आहेत. घरात शैक्षणिक वातावरण नसताना त्या एफ. वाय. बी. ए. झाल्या. पण शाळेतील शिक्षणापेक्षा त्यांनी समाजातच अधिक शिक्षण घेतले. त्यांची पहिली ते तिसरीपर्यंतची शाळा गावच्या मारुती मंदिरात भरत असे. तेथे मंदिरात येणाऱ्या सर्व भक्तगणांकडे त्या कुतुहलाने पहात बसत. घंटा, धूप, अगरबत्ती मंदिरातील गुरवीण काय करते? याकडेच सर्व लक्ष असे.

चौथी ते सातवीपर्यंतचे शिक्षण कन्या विद्यामंदिर या शाळेत झाले. चौथीपर्यंत त्यांना घड्याळ समजत नव्हते. एका छोट्याशा गैरसमजातून बाईंनी त्यांच्यावर राग धरला याचा परिणाम त्या चौथीत नापास झाल्या. याबद्दल कोणाला काहीही वाटले नाही. चौथीत असताना माणगावेंना लती नावाची जैनेतर मैत्रिण भेटली. ती व तिच्याघरचे लोक फार लबाड होते. माणगावे तिच्यामुळे गैरमार्गाला लागणार होत्या पण त्यांच्या आईच्यामुळे त्या वाचल्या.

पाचवीला त्यांचे हिंदी व इंग्रजी विषय नवीन होते. माणगावेंची हिंदीपेक्षा इंग्रजीची अवस्था वाईट होती. त्यांचा इंग्रजी विषय फारच कच्चा होता. सातवीपर्यंत त्या मुलींच्या शाळेत शिकल्या. आठवीला रयत शिक्षण संस्थेच्या म. गांधी विद्यालयात मुलं व मुलींच्या शाळेत दाखल झाल्या. मुलांच्या शाळेत प्रथमच गेल्याने त्या एका दडपणाखाली घाबरून वावरत असत. नववीला माणगावे वयात आल्यानंतर तर त्यांची आई त्यांना शाळेव्यतिरिक्त कोठेही पाठवत नसे. त्यांचे वाचनकौशल्य चांगले असल्याने शिक्षक त्यांना १०वी, ११वीच्या वर्गात वाचन करावयास नेत असत. नववीनंतर त्यांना त्यांच्या आईने कोल्हापूरला पाठवले. पुढे मामाकडे राहून दहावीसाठी 'देशभूषण हायस्कूल' कोल्हापूर येथे प्रवेश घेतला. त्या तेथेच एस. एस. सी. पास झाल्या. पण इंग्रजी विषय राहिला. तो सोडवल्याशिवाय कॉलेज करता येत नसल्याने त्यांनी इंग्रजी विषय सोडवून महावीर कॉलेजमध्ये कोल्हापूर येथे प्रवेश घेतला. माणगावेंचे शाळेतील नाव ताराबाई होते. या नावावरुन त्यांना कॉलेजमध्ये खूप त्रास झाला. कॉलेजची मुलं त्यांना 'तारा' नावावरुन चिडवत. तारा शब्द असणारी गाणी म्हणत असत. फळ्यावर, भिंतीवर त्यांचे नाव लिहीत. पण प्राध्यापकही त्यांना काही बोलत नसत. अशा त्रासामुळे त्यांना शिक्षण सोडावे असे वाटत असे.

लेखिका ज्या मामांच्या घरात रहात तेथे एकूण अकरा माणसं होती. लाईट नव्हती. पावसाळ्यात गळत असे. नऊ जण शाळेत जाणारी असल्याने एका कंदीलवकर चौघेजण अभ्यास करत असत. एकंदरीत शैक्षणिक वातावरण त्यांना कधी लाभले नाही. तसेही शिक्षण घेण्यामागे त्यांचा विशेष हेतू नव्हता. लग्न होईपर्यंत काय करायचं? म्हणून त्या शिक्षण घेत होत्या.

नीलम माणगावे प्रथमपासूनच वक्तृत्व स्पर्धेत भाग घेत असत. कॉलेजमध्ये असताना त्यांनी कबड्डी स्पर्धेत भाग घेतला होता. कॉलेजमध्ये त्या साडी नेसत असत. शिवाजी विद्यापीठात त्या कबड्डी खेळण्यासाठी आल्या तेव्हा त्यांना चड्डी व टी शर्ट घालावा लागला. या वेशात मामांनी त्यांना पाहिले. घरात त्यांनी काहीही सांगितले नसल्याने त्या घाबरुन खेळल्याच नाहीत. कॉलेजच्या स्नेहसंमेलनात त्यांनी भाग घेतला होता. तसेच महिलाश्रमाच्या एका 'शीलसम्राज्ञी' या नाटकात त्यांनी पाहुणी कलाकार म्हणून भाग घेतला होता. अशा प्रकारे विविध उपक्रमात भाग घेण्याचा त्यांचा उत्साह दांडगा होता.

**जीवनातील महत्त्वाच्या घटना**

प्रत्येक मनुष्याचे आयुष्य हे घटना, प्रसंगांनी भरलेलं असतं. काही घटना आयुष्याला मोठी वळणं देणाऱ्या असतात. बालपणीची चौथी 'लती' नावाची त्यांची मैत्रीण त्यांना खूप प्रिय होती. माणगावे त्यांना आपल्या घरातल्या वस्तू, गहू, डाळ, तांदूळ, ब्लाऊज पीस इ. चोरुन त्यांना देत असत. एक दिवस लतीला ड्रेस घेण्याचे सर्वानुमते ठरले. त्यासाठी प्रत्येकीने २५ रु. आणायचे ठरले. यासाठी त्यांनी अमेरिकेच्या मामाच्या खिशातल्या ५ रु.च्या नोटा समजून १०० रु.च्या नोटा चोरल्या व लतीच्या आईला नेऊन दिल्या. पाचशे रु. चोरीला गेल्याने घरात एकच गोंधळ सुरु झाला. त्यांना खूप वाईट वाटले व तेंव्हापासून आपण आयुष्यात पुन्हा कधीही चोरी करायची नाही हे त्यांनी ठरवले.

नववीला असताना माणगावे वयात आल्या. घरी वयात आल्यावर पाचव्या दिवशी बँडसह बस्तीला जाऊन धार्मिक विधी करण्याची रीत होती. याला त्यांनी स्पष्ट नकार दिला. न पटणाऱ्या गोष्टींना त्यांनी नेहमी विरोध केला. मुलगी वयात आल्याचं असं वाजवून ओरडून जगाला सांगणं हे खूपच अमानुष, भयानक आहे असे त्यांना वाटे.

आईने शिक्षणासाठी कोल्हापूरमध्ये पाठविणे ही त्यांच्या आयुष्यातली महत्त्वाची घटना आहे. त्यामुळे त्या रूकडीमधील त्रासदायक जीवनापासून दूर गेल्या. तसेच त्यांना वेगळे जग बघायला मिळाले. पुढील शिक्षण झाले. शिक्षण घेता घेता विविध कार्यक्रमात सहभागी होता आले. यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व प्रभावशाली बनले.

लेखिकेंची मामी जुन्या वळणाची, जैन रीतीरिवाज पाळणारी होती. त्यांच्याकडे सोवळं ओवळं, शिवाशीव पाळली जात असे. शौचाला जाताना त्या ब्लाऊज, परकर न घालता एक जुनं फडकं साडी म्हणून गुंडाळायला सांगत व रस्त्याकडेच्या शौचालयात जायला सांगत असे. पुरोगामी विचारसरणीच्या नीलमबाईंना हे पटले नाही. त्यांनी असे वागण्यास नकार दिला. मामी खूप ओरडल्या पण त्यांचे त्यांनी ऐकले नाही. उलट पुरुषांना का नाही सोवळं-ओवळं? असा प्रश्न विचारला.

१९७६ साली माणगावेंना जसे हवे तसे स्थळ आले व त्यांनी रमेश माणगावे यांच्याशी विवाह केला. विवाह ही त्यांच्या आयुष्यातील महत्त्वाची घटना आहे. १९९७ पासून त्यांनी लेखनास सुरुवात केली. 'शांते तू जिंकलीस' या त्यांच्या कथासंग्रहाला महाराष्ट्र राज्य साहित्य पुरस्कार मिळाला. तसेच 'साक्षीदार' या कथासंग्रहाला साली यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचा बाबूराव बागुल पुरस्कार मिळाला. हीच प्रेरणा घेऊन वाचकांचा आपल्यावरील विश्वास व अपेक्षा ओळखून त्या जोमाने लिहू लागलेल्या दिसतात.

**भावलेल्या व्यक्ती**

नीलम माणगावे यांच्या वाड्यात शांता नावाची देखणी, उंच, कामसू, जिद्दी बाई रहात होती. एकदा शांतेचा नवरा दारु पिऊन माडीवरुन पडला. सर्व लोक जमले पण शांता आली नाही. शांताला आपल्या घामाचा, कष्टाचा पैसा दारु पिणाऱ्या नवऱ्याच्या औषधोपचारावर खर्च करण्यापेक्षा आपल्या मुलांसाठी खर्च करणे योग्य वाटले. दारुड्या नवऱ्याला जगवून काय करायचे असा ती विचार करते. अशा व्यक्तिमत्त्वाला पाहून माणगावे लिहितात, ''स्त्री हक्क, स्त्री स्वातंत्र्य, स्व-जाणीव, आत्मभान हे शब्द तिला माहित नाहीत पण हे शब्द ती जगली. हे धाडस किती स्त्रियांजवळ आहे?''[२]

'हरे राम' हे माणगावेंना भावलेलं असंच एक व्यक्तिमत्त्व. तिचा कर्मकांड, सोवळं यावर विश्वास नव्हता. ती गावातल्या मुलींना, बायकांना वयात येणं, त्या दिवसात स्वच्छता कशी राखावी?, स्त्रीत्व, या वयातले धोके, लग्न, शरीरसंबंध इ. विषयी माहिती सांगत असे. तिचे हे वेगळे विचार ऐकून माणगावे भारावून जात असत.

नीलम माणगावे यांच्या घरात भाड्याने राहणारी, चौथी शिकलेली एक विधवा होती. सगळेच मरतात पण देशासाठी मरणं तिला मोलाचे वाटतं. तिला स्वत:ला सुद्धा सैन्यात जाण्याची खूप इच्छा होती. पण ती पूर्ण झाली नाही. तसेच 'हरे राम'ला वाचनाचीसुद्धा खूप आवड होती. दुकानातून पुडी बांधून आणलेला कागद पण ती वाचत असे. लेखिकेवर या व्यक्तिमत्त्वांचा प्रभाव पडलेला दिसतो.

नीलम माणगावे यांना प्रभावित करणारं व्यक्तिमत्त्व म्हणजे त्यांची आई. आईला गावातल्या लोकांनी खूप त्रास दिला. त्यांना झुंज देत तिने आपल्या मुलींवर संस्कार केले. त्यांना सांभाळले. आईचा कर्मकांड, सोवळे ओवळे, अस्पृश्यता, शिवाशिव यावर खूप विश्वास होता. लेखिकेने त्यांना परोपरीने समजावले. प्रसंगी विरोधही केला पण नसानसात भिनलेले संस्कार त्या विसरल्या नाहीत. आईने कितीतरी असहाय्य बायकांना आपल्या घरात आसरा दिला. भुकेलेल्यांना खाऊ-पिऊ घातले. पशु-पक्ष्यांवर प्रेम केले. म्हणूनच त्यांना आपल्या आईमध्ये देवपण दिसते. त्यांनी आपल्या तिन्ही मुलींची लग्न लावून दिली. त्यांचे माहेरपण केले. एखादा पुरुष करणार नाही एवढे कष्ट घेतले. म्हणूनच आईचे व्यक्तिमत्त्व त्यांना विशेष प्रभावित करताना दिसते.

वैवाहिक जीवन -

१९७६ साली रमेश माणगावे यांच्याशी त्या विवाहबद्ध झाल्या आणि त्यांचे जीवनच बदलून गेले. रसिक मनाच्या पतीने त्यांना साहित्य संमेलनात वरचेवर नेऊन लिहिण्यासाठी प्रवृत्त केले. घरच्या सर्वांनी यासाठी पाठिंबा दिला. त्यांनादेखील उत्साह येऊन त्या प्रत्येक साहित्य संमेलनात आवर्जून सक्रिय सहभागी होऊ लागल्या. तिथेच त्यांनी मोठ मोठ्या व्यक्तिंची मनोगते ऐकली. व्याख्याने ऐकली व आपणही लिहावे अशी जबरदस्त इच्छा त्यांच्या मनात निर्माण झाली. नंतर त्यांनी कवितासंग्रह, कादंबरी, कथा इ. साहित्य लेखन केले.

नीलम माणगावे यांच्या आईचे संस्कार व लहानपणीचे विविध अनुभव यामुळे त्यांच्या लेखनाला प्रगल्भता आली. सासरच्यांचा पाठिंबा, पतीचे प्रोत्साहन या सर्वांचा प्रभाव

त्यांच्या लेखनावर दिसतो. त्यांच्याकडे बदलत्या समाजाला स्वीकारण्याची व समाज बदलण्यासाठी लागणाऱ्या विचारांची क्षमता आहे. सर्वसामान्य स्त्रीपेक्षा नीलम माणगावेंचे व्यक्तिमत्त्व वेगळे आहे. स्वतंत्र विचारसरणी, निर्णय क्षमता, प्रेमळ स्वभाव, आर्थिक सुबत्ता, चिंतनशीलता, पुरोगामी विचारसरणी ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची खास वैशिष्ट्ये दिसतात. यानुसारच त्यांच्या साहित्यकृतीचे स्वरूप दिसते.

**सामाजिक कार्यातील योगदान –**

नीलम माणगावे यांचे लेखनकार्य सदोदित चालूच असते. त्याचबरोबर त्या तीर्थंकर, प्रगती आणि जिनविजय, द. म. साहित्य सभा, कोल्हापूरच्या सहसंपादक म्हणून काम पहातात. साहित्य रसिक व्यासपीठ जयसिंगपूरच्या उपाध्यक्षा आहेत. बालकुमार साहित्य सभा, कोल्हापूरच्या सदस्य आहेत. अनेक साहित्य संमेलने, कविता संमेलनात कविता वाचन, कविसंमेलनाध्यक्ष म्हणून त्यांचा सहभाग आहे.

शाळा, कॉलेज, मंडळातून त्या कथाकथन, काव्यवाचन करीत असतात. आकाशवाणी सांगली, कोल्हापूर, औरंगाबाद येथे त्यांनी कवितावाचन केलेले आहे. मुलांमध्ये साहित्याची आवड निर्माण व्हावी म्हणून बालकुमार सभेमार्फत जाणीवपूर्वक प्रयत्न त्या करीत असतात. विविध वृत्तपत्रे, मासिके, दिवाळी अंकातून त्यांच्या कविता, ललित लेख प्रसिद्ध होत असतात. केसरी विविधामधून 'माजघरातले हुंदके', 'रोहिणी' मासिकातून 'बोलक्या भिंती', श्रविका मासिकातून 'हितगुज', 'जनस्वास्थ्य' त्रैमासिकातून सदर, लोकमतमधील मंथन पुरवणीत 'रान पाखरं', 'गौरी आणि चमेली' अशी त्यांची सदरे प्रसिद्ध झालेली आहेत. अखिल भारतीय कवयित्री संमेलनामार्फत जुलै २००७मध्ये मॉरीशसमधील संमेलनात त्या सहभागी झाल्या आहेत.

**वाङ्मयीन कामगिरी**

मानवी स्वभाव आणि आयुष्याच्या विविधांगाचे सूक्ष्म निरीक्षण करुन वास्तववादी लेखन करणाऱ्या नीलम माणगावे यांनी साहित्याचे विविध प्रकार हाताळले आहेत. विविध प्रकारच्या लेखनातून स्त्रीचे दु:ख चित्रित करण्याचा स्त्रीला सोसाव्या लागणाऱ्या अन्यायाला

जुलुमाला वाचा फोडण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. मराठी साहित्यात अनेक लेखिका या केवळ कविता, कादंबरी, आत्मकथन अशा एखाद्याच वाङ्मयप्रकारावर लिहिताना आढळतात. पण नीलम माणगावे यांनी मात्र कथा, कविता, काबंदरी, लोकसाहित्य इ. विविध वाङ्मय प्रकारात लेखन केले आहे. जेवढ्या ताकदीने कथा लिहिल्या, तेवढ्यात ताकदीने त्यांनी कादंबऱ्याही लिहिल्या व इतरही लेखन केले आहे.

**कथाविश्व**

नीलम माणगावे यांचे तीन कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. त्यांनी 'साक्षीदार' (२००१), 'तीच माती तेच आकाश' (२००२), 'शांते तू जिंकलीस' (२००२), ' ज्वालाग्रहीच्या तोंडावर (२००७), 'फटफटलंय, आता नक्की उजडलं...'(२००८) हे कथासंग्रह लिहिले आहेत. त्यांनी जे कथालेखन केले त्यातून स्त्रिची व्यथा धीटपणे मांडली आहे. त्यांची कथा जशी व्यथा मांडते तशी प्रौढ कुमारिकेबरोबरच, विवाहित स्त्रीचे दु:ख, विधवांचे दु:ख व्यक्त करताना एक मूल्यविषयक जाणीव ठेवते.

'साक्षीदार'(२००१) या कथासंग्रहात दहा कथा आहेत. 'साक्षीदार' ह्या कथेमध्ये 'शिवा' व 'तारा' या घरकाम करणाऱ्या दोघांची कथा आहे. लेखिका अस्पृश्यतेविषयी लिहितात, " आईनं लोट्यातनं आणलेलं पाणी घालताच शिवानं कपबशी विसळून घेतली... स्वातंत्र्याला पन्नास वर्षे लोटली. तरी... आंबेडकर जयंतीला सार्वजनिक सुट्टी जाहीर झाली तरी फरक कुठं पडला होता?"[३] नीलम माणगावेंनी आपल्या डोळ्यांसमोर आपल्या तरुण मुलाला गमावण्याचं दु:ख काय असतं याचं हृदयद्रावक चित्रण 'समाधी' या कथेत त्यांनी केले आहे. ज्या स्वातंत्र्यसैनिकाने आपला देह देशासाठी झिजवला अशा स्वातंत्र्यसैनिक वृद्धाची व्यथा 'सत्कार' या कथेत लेखिकेने मांडली आहे. 'पाच मिनिटाचा खेळ' या कथेत एका स्त्रीला रात्रीच्या दोन तासाच्या रेल्वेप्रवासात जे वाईट अनुभव येतात त्याचे वर्णन आहे. 'आजी गेलीच नव्हती' कथेत बालविधवा झालेली एक वृद्ध स्त्री आपले संपूर्ण आयुष्य समाजाची सेवा करण्यात घालवते. सर्वांना मदत करणारी आजी वारली नसून ती आपल्या अंत:करणात आहे असे लेखिकेने चित्रित केले आहे. 'पडझड' या कथेत

नायिका खूप वर्षांनी आपल्या घराची, गावातल्या लोकांची पडझड पाहते तेंव्हा ती दुःखी होते, असे चित्रण आले आहे. 'आनंद वाट पहात असेल' या कथेत वैशाली आणि अरुण या दांपत्याला मतिमंद मुलगा होतो. त्याचा वैशाली सुरूवातीला तिरस्कार करते. नंतर. आनंदाने स्वीकार करते अशाप्रकारचा आशय आहे. 'रिता तरी भरल्यासारखा' या कथेत हा वृद्धांचा प्रश्न उपस्थित केला आहे. 'स्पर्श' या कथेमध्ये मातृत्व प्राप्त स्त्री एका संन्याशाला लहान मुलांमध्येदेखील ईश्वर असतो असा दृष्टिकोन देते. लेखिकेने 'साक्षीदार' या कथासंग्रहातील कथांमधून विविध विषय हाताळलेले दिसून येतात. वृद्ध, मतिमंद, स्वातंत्र्यसैनिक, स्त्रियांच्या व्यथा अत्यंत प्रभावीपणे मांडलेल्या दिसतात.

' तीच माती तेच आकाश' (२००२) या कथासंग्रहातील 'तीच माती तेच आकाश' या कथेमध्ये आई-वडिलांच्या एकुलत्या एक लाडक्या मुलीवर जीपमध्ये बलात्कार होतो. या कथेत शर्मिला या किशोरवयीन मुलीवरील बलात्कारासारखी महाभयंकर घटना घडलेल्या मुलीची मानसिक अवस्था लेखिकेने अतिशय परिणामकारकरितीने चित्रित केली आहे. इस्टेटीसाठी भाऊबंद कोणकोणत्या युक्त्या करतात? हे लक्षात येऊन स्वतःला सावरण्याचा प्रयत्न करणाऱ्या तरुणाची कहाणी 'वेडं कोकरु' या कथेत चित्रित केली आहे. 'आवडी' या कथेत आवडी ही द्रुपदा व दत्ताची एकुलती एक मुलगी अपंग व खुळी असते. एक दिवस आवडीवर बलात्कार होतो व ती गरोदर रहाते. बलात्कार करणारा दुसरा तिसरा कोणीही नसून आवडीचाच सख्खा बाप आहे हे लक्षात आल्यावर द्रुपदा चिडते त्याला ठार मारायला त्याच्या मागून धावते. त्याचवेळेस तो गाडीखाली सापडतो रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या नवऱ्याला तसंच टाकून ती आवडीकडे जाण्यासाठी निघते तेव्हा लोक तिला तोंडाला येईल ते बोलतात. पण ती कोणाकडेही लक्ष देत नाही. 'आवडी' या कथेत चंडिकेचे रूप घेऊन राक्षसाचा वध करायला निघालेल्या स्त्रीचे दर्शन घडते.

'अनुत्तरित' या कथेत लग्नाला एकवीस वर्ष पूर्ण झाल्यानंतर आकाशी आपल्या पतीला प्रश्न विचारते इतक्या वर्ष त्याने आपल्यासाठी काय केलं? प्रश्न विचारता विचारता तिचा नवरा अनुत्तरित होतो. 'शह' या कथेत आंतरधर्मिय विवाहामुळे निर्माण होणाऱ्या

समस्यांचे चित्रण केले आहे. ती वारल्यानंतर तिच्या देहाचे काय झाले हे सांगताना त्या लिहितात, " दोन्हींकडून जातीभाईंचा पाठिंबा असल्यामुळे कुणीच मागे हटेनात. आमिनाचा देह तसाच पडून राहिला."[४]

'घरटं' कथेत कलिका परिपूर्ण स्त्री नाही या गैरमजात पुरुषोत्तम बरोबर विवाहबद्ध होऊन तीन महिने संसार करते. नंतर गैरसमज दूर होऊन ती दोघे एकत्र रहाण्याचा निर्णय घेतात असे चित्रण आले आहे. 'उलघाल' या कथेत अजयचे आईवडील स्वार्थासाठी त्याला कॅन्सर झालेला असूनही त्याचं लग्न आशाबरोबर लावतात. नीलम माणगावे यांनी आशाची मानसिक उलघाल परिणामकारकरित्या केली आहे. त्यांच्या 'तीच माती तेच आकाश' या कथासंग्रहातील कथा विशेषत: स्त्री मनाचेच दर्शन घडवितात दिसतात. तिच्या दु:खाला कोणीतरी जबाबदार आहे असा स्वर त्यांच्या कथेतून उमटताना दिसतो.

'शांते तू जिंकलीस' हा नीलम माणगावे यांचा कथासंग्रह २००२ साली प्रसिद्ध झाला. या कथा संग्रहात सात कथा आहेत. 'हेच माझं घरं' या कथेत चार मुलांना जन्म देऊन नंतर वडीलही सन्यास घेतात. घराची पूर्ण जबाबदारी रजनीवर येऊन पडते. ती सर्वांची लग्न करुन देते पण स्वत: प्रौढ कुमारिका रहाते. सर्व तऱ्हेने कोंडमारा सहन करावा लागतो याचे दर्शन 'हेच माझं घर' या कथेतून झाले आहे. 'निलूआत्या' या कथेत एका विधवेचे दु:ख मांडले आहे. काहीच गुन्हा केला नसताना विधवांची होणारी मानहानी याविरुद्ध विधवा स्त्रिया पेटून उठताना दिसतात. 'देव' या कथेतील नायिका दगडातील देवावर विश्वास न ठेवता माणसात देव शोधताना दिसते. 'तिला सन्मानानं स्वीकारलं का?' या कथेत रात्रीच्या वेळी प्रवासात अडकल्याने सुलभा एका मुसलमान सईदच्या रिक्षातून घरी येते पण तिचा नवरा तिला स्वीकारत नाही. या कथेत स्त्रीची आगतिकता अत्यंत परिणामकारकरितीने चित्रित केलेली दिसते. 'वादळ' या कथेत एका सुखी कुटुंबात एकदा वादळ येतं व त्यांच कुटुंब उध्वस्त होतं. बलात्कार झालेली चारु पतीला सोडून आपल्या दोन मुलींसह वसतिगृहात रहायला जाते. नोकरी करत असणाऱ्या स्त्रियांना अशा महाभयंकर समस्यांना सामोरे जावे लागते याचे चित्रण 'वादळ' कथेत केले आहे. 'जय नावाचा पराजय' या कथेत आशा खोत

यांची त्याच्यापेक्षा वयाने लहान अशा जय नावाच्या मुलाबरोबर पत्रमैत्री होते. आशा खोत त्याला रूपापेक्षा मन श्रेष्ठ असते हे पटवून देण्याचा प्रयत्न करतात. या कथेचे कथानक पत्रातून उलगडत गेलेले दिसून येते. 'शांते तू जिंकलीस' ही एक ग्रामीण कथेतून लेखिकेने या कथेत काव्यात्मकतेचा वापर केलेला दिसतो, "आशीर्वाद देऊनी वदते व्हा आता औक्षवाण, शुभ मंगल सावधना बाळांनो, शुभमंगल सावधान."[५] संकटांशी झुंज देणाऱ्या अशा खंबीर स्त्रीचे चित्रण अत्यंत परिणामकारकरित्या केलेले दिसते.

'ज्वालामुखीच्या तोंडावर' (२००७) या कथासंग्रहात एकूण दहा कथा आहेत. 'वळून बघताना', 'ज्वालामुखीच्या तोंडावर' , 'सँडविच' , 'चार म्हातारे आणि मी' इ.कथा लिहिलेल्या आहेत. या कथेमधून पतीबद्दलच्या नाजूक आठवणी, हिंदू-मूस्लीम दंगलीचे दुष्परिणाम मानवी नातेसंबंध, कामवासनेचे परिणाम इ. आशय चितारला आहे. 'चार म्हातारे आणि मी' या कथेत कुटुंबातील नात्याचे भावचित्रण प्रगट झाले आहे. " जो माणूस बायकोच्या काळा रंगाचा तिरस्कार करतो. बायकोनं फक्त मुलीचं दिल्या म्हणून तिचा मुलींसह त्याग करतो तो माणूस बोलण्याच्याही लायकीचा नाही."[६] लेखिका असे स्त्रीवादी विचार मांडताना दिसतात.

नीलम माणगावे यांनी आपल्या कथांमधून विविध विषय, स्त्री समस्या कलात्मकरित्या मांडल्या आहेत. सूक्ष्म मनोविश्लेषण व स्त्री-जीवनातील समस्यांचे वृत्तिगांभीर्याने केलेले चित्रण हे त्यांच्या कथेचे विशेष दिसून येतात. त्यांच्या कथेतील व्यक्तिरेखा सुष्ट व दुष्ट प्रवृत्तीच्या, चिंतन करणाऱ्या, विचारी, सात्विक वृत्तीच्या देखील व्यक्तिरेखा दिसतात.

कादंबरी लेखन:

नीलम माणगावे यांनी आपल्या वाङ्‌मयीन प्रवासात एकूण पाच कादंबऱ्या लिहिल्या आहेत. १९९७ साली त्यांची 'डायरी' ही कादंबरी प्रकाशित झाली. ही ग्रामीण कादंबरी आहे. मूल न झालेल्या स्त्रीचे दु:ख, वेदना त्यांनी 'डायरी' या कादंबरीत चित्रित केल्या आहेत. रोजनिशीविषयी मावशी केदारला म्हणते झाकली मूठ सव्वा लाखाची असते आणि

ती सांभाळायची असते!... आपल्या जीवनाची डायरी शिंपल्यात बंद करून त्यावर मोहर उटवायची असते.''[७] रोजनिशी पद्धतीने या कादंबरीचे कथानक उलगडत जाताना दिसते.

'जिद्द' ही १९९८ साली प्रकाशित झालेली कौटुंबिक कादंबरी असून एक स्त्री अपंग असून देखील तिची स्वावलंबनाने जगण्याची धडपड वाचकाला थक्क करुन सोडणारी आहे. अपंग असूनही तिचे आनंदी जगणे पाहून चित्रा म्हणते, '' जे भल्याभल्यांना जमलं नाही ते तू करून दाखवलसं! नियतीलाही तुझी जिद्दीनं हरवलंस.'' 'जिद्द' कादंबरी विषयीच्या अभिप्रायात प्रा. एस.एस. सारडा लिहितात, ''माणगावेंनी एक जिद्दी स्त्रीची धडपड, चिकाटी फारच कल्पकतेने चित्रित केली आहे. पुस्तक वाचताना मी इतका एकरुप झालो की, वेळचे भानही राहिले नाही...नायिकेची धडपड वगैरे वाचून वाटते की आपण कुठल्यातरी जवळच्या व्यक्तिचे असे जीवन अगदी, जवळून अनुभवलं आहे. एका अपंग व्यक्तिची धडपड पाहून सुदृढ व्यक्तिलाही काहीतरी करावेसे वाटेल व प्रेरणा मिळेल.''

'सोन्या' ही १९९९ साली प्रकाशित झालेली कादंबरी बालगुन्हेगारीचे प्रभावी चित्रण करताना दिसते. या कादंबरीतील हुशार, गुणी सोन्याची आई लहानपणीच वारते. सोन्या छोट्या चोऱ्या करता करता मोठ्या चोऱ्या करू लागतो. पोलीस त्याला पकडून रिमांड होममध्ये ठेवतात. त्याच्या वागण्यात, विचारात बदल होतो. सोन्या कादंबरीत सोन्याप्रमाणे इतरही मुलांचे विविध प्रश्न मांडले आहेत. तसेच बाल किशोर मनाच्या प्रश्नांची दखल घेतलेली त्यांच्याबद्दल लिहिताना लेखिका लिहितात, ''मानसिकतेतून उद्‌भवलेली ही बालगुन्हेगारी म्हणजे क्षणभराच्या भावभावनांचे उद्रेकच.''[९]

'शोध' ही २००५ साली प्रकाशित झालेली सामाजिक कादंबरी आहे. वेश्येच्या जीवनावर आधारीत 'शोध' ही कादंबरी एका सामाजिक प्रश्नाला वाचा फोडताना दिसते. वाचकांना विचार करायला भाग पाडताना दिसते.

'मृत्यूदंड' ही २००६ साली प्रकाशित झालेली स्त्रीवादी भूमिकेतून लिहिलेली कादंबरी आहे. विवाहसंस्था स्त्रियांसाठी खरोखरच सुरक्षित आहे का? हा विचार करायला भाग पाडणारी 'मृत्यूदंड' ही कादंबरी आहे. विवाहित स्त्रीलादेखील अनेक संकटांना सामोरे जावे

लागते. कमवती नसल्याने तिला कसे परावलंबी रहावे लागते याचे उत्कृष्ट चित्रण या कादंबरीत केलेले दिसते. तसेच कुष्ठरोग्यांचे दु:ख व जैन समाजाचेही चित्रण केलेले दिसते.

नीलम माणगावे यांनी 'डायरी', 'सोन्या', 'जिद्द', 'शोध', 'मृत्युदंड' कादंबऱ्यांमधून वाचकांच्या मनाला भिडणारे सर्वसामान्यांचे प्रश्न मांडले आहेत. त्यांनी बालगुन्हेगार, वेश्या, विवाहित स्त्रीची दु:ख, अपंग स्त्रीची संकटाशी सामना करण्याची मन:शक्ती इ. विविध विषय त्यांनी प्रभावीपणे चित्रित केल्याचे दिसून येते.

**'आत्मकथन'**

नीलम माणगावे यांनी आपले जीवनानुभव आयुष्यात भेटलेल्या चांगल्या वाईट प्रवृत्तीच्या माणसांचे चित्रण आपल्या आत्मकथनातून केले आहे. श्रीपाद प्रकाशनाने २००६ साली प्रकाशित केलेल्या 'जसं घडलं तसं' या त्यांच्या आत्मकथन लिहिण्याचा उद्देश आपल्या मनोगतात व्यक्त केला आहे. त्या लिहितात ''स्त्री जीवनाचा बळी घेणारी समाजाची पुरुषी व्यवस्था आहे जी एखाद्या विधवेचे जीवन मरणप्राय करुन सोडते. तिच्या मुलीचं बालपण हिरावून घेते... आपल्या विशेषत: आईच्या जीवनात हे सारं घडलं. तेच प्रामाणिकपणे सांगण्याचा प्रयत्न केला आहे.''[१०] लेखिका आपल्या विधवा आईच्या दु:खाविषयी भाष्य करताना लिहितात, '' आजही स्त्रीला एक माणूस म्हणून, एक व्यक्ती म्हणून स्वीकारलं जात नाही. ' स्त्री म्हणजे वंश निर्मितीचं साधन!' याच दृष्टीकोनातून तिच्याकडे पाहिलं जातं. ''[११]

'जसं घडलं तसं' या आत्मकथनाच्या अभिप्रायात मधु मंगेश कर्णिक लिहितात, ''तुमचे हे कथन विलक्षण स्वरुपाचे, मन सुन्न करणारे आणि समाजाची एक वेगळी बाजू अतिशय परिणामकारकरीतीने सांगणारे असे आहे.''

**काव्यलेखन**

विपुल लेखन करणाऱ्या नीलम माणगावे यांनी सामाजिक जाणिवेतून विविध विषयांवर लेखन केले आहे. स्त्रीवादी जाणिवेतून लिहिणाऱ्या त्या एक सजग लेखिका आहेत. त्यांनी १९९५ साली 'गुलदस्ता' नावाचा काव्यसंग्रह प्रसिद्ध केला. मनाला

भिडणाऱ्या, सामाजिक, प्रेमाच्या, समाजातील कटू सत्यावर प्रकाश टाकणाऱ्या कविता लिहिल्या आहेत.

'शतकाच्या उंबरठ्यावर' हा काव्यसंग्रह मनोदय प्रकाशनने २५ डिसेंबर १९९७ साली प्रकाशित केला आहे. या काव्यसंग्रहात स्त्रीविषयक, सामाजिक कविता आहेत. या काव्यसंग्रहाला आश्विनी धोंगडे यानी प्रस्तावना लिहिली आहे. त्यात त्या लिहितात, ''त्यांची कविता स्त्री जाणिवेची कविता आहे. ही गोष्ट मला विशेष महत्त्वाची वाटते. 'विश्वास माझा माझ्यावरती, होईल नक्कीच आत्मक्रांती' '' स्वत:वरचा विश्वास असणं आणि तो शाबूत ठेवणं स्वत:च व्यक्तिमत्व समजून घेण्याची पहिली खूण आहे आणि ती जाण माणगावे यांच्या कवितेत जागोजागी सापडते... मळलेली वाट सोडून बुरखा फाडून नवी वाट शोधण्याचं कुतूहल त्यांच्या प्रतिभेला आहे आणि पंख उघडले की आकाशात झेपावता येत हा स्वशक्तीचा साक्षात्कार त्यांच्या मनाला आहे त्यामुळे धीटपणे त्यांची कविता स्वत:ची नवी वाट चोखाळताना दिसते.''[१२]

नीलम माणगावे यांच्या 'जिनज्योत' (१९९९) या पुस्तकात जैन भक्तिगीतांचा अंतर्भाव आहे. 'जाग' (२००१) या काव्यसंग्रहातील जवळ जवळ सर्वच कविता या स्त्रीजाणिवांचा वेध घेणाऱ्या आहेत. या काव्यसंग्रहाच्या प्रस्तावनेमध्ये डॉ. माया पंडीत लिहितात, ''नीलम माणगावे सारख्या एका नवोदित कवयित्रीच्या कविता वाचताना बाई म्हणून संत्रस्थ, अस्वस्थ, बेचैन व संतप्त असणाऱ्या एका सच्च्या मनाचे दर्शन घडते.''[१३]

नीलम माणगावें यांची कविता आई, मुलगी, गृहिणी, वेश्या, पती-पत्नी अशा विविध नात्यांच्या रुपांच्या दाहक अनुभवांचे प्रत्यंतर मांडू पहाते. त्यांच्या कवितांची बोली सहज सुलभ आहे. शैली अनलंकृत, प्रवाही आहे. स्वत:चे स्वतंत्र स्थान निर्माण करणारी त्यांची कविता वाचनीय आहे. अनुभवांचा सच्चेपणा आणि अनलंकृत भाषाशैली ही त्यांच्या कवितेची शक्तिस्थाने आहेत.

**लोकसाहित्य**

नीलम मागणावे यांनी कथा, कविता, कादंबरी, आत्मकथन याबरोबरच लोकसाहित्यसुद्धा लिहिले आहे. 'उखाण्यातून स्त्रीदर्शन' ह्या २००१ साली मनोदय प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या त्यांच्या पुस्तकात संकलित केलेले उखाणे आहेत. त्यांनी स्त्री-जाणिवेच्या दृष्टिकोणातून त्याचा शोध घेतला आहे. या पुस्तकाला तारा प्रवाळकरांनी प्रस्तावना लिहिली आहे. 'उखण्यातून स्त्रीदर्शन' मध्ये पुरुषांचे उखाणे, तसेच रुखवताचे उखाणेही आहेत.

**बालसाहित्य**

आजचे बालकच उद्याचे नागरीक होणार असतात. त्यांना सुजाण, सुसंस्कारीत बनवण्यामध्ये पुस्तक, बालसाहित्य फार मोठा हातभार लावताना दिसते. बालपणी झालेले संस्कार हे व्यक्तिला कधीही पुसता येत नाही. म्हणून लहानपणीच जर मुलांना चांगले साहित्य वाचायला मिळाले तर त्यांना वाचनाची गोडी लागते व ज्ञानाबरोबरच सुसंस्कारही होत असतात. नीलम माणगावे यांनी बालसाहित्यात कथा, कादंबरी, बडबड गाणी लिहिली आहेत. 'परिराणी आणि छान छान गोष्टी'(१९९५), थुई थुई कारंजे भाग १ व २ ही बाल गाणी, 'हॅलो देवबाप्पा' (१९९९) हा नाटिकासंग्रह प्रसिद्ध आहे. 'बिदुकली' (१९९९), 'तूच आमचा हिरो' (१९९९), 'या चुकेला क्षमा नाही' (२००५), 'चिंगळी' (२००५) हे कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. 'बकुळीची गोष्ट' (२००४), 'गौरी आणि चमेली' (२००७) या दोन कादंबऱ्या प्रकाशित आहेत.

'करील मनोरंजन जो मुलांचे जडेल नाते प्रभुशी तयाचे' असे साने गुरुजींनी म्हटल्याप्रमाणे नीलम माणगावेंनी आपल्या बालसाहित्यातून प्रभूशी नाते जोडण्याचा प्रयत्न केला असल्याचे दिसते.

नीलम माणगावे यांच्या बालसाहित्यातील पुस्तकांची भाषा, साधी, सोपी, सुबोध आहे. लहान मुलांच्या मानांची पकड घेणारी आहे. त्यांच्या कथा, कादंबऱ्या बालकांवर सुसंस्कार घडविताना दिसतात.

**मिळालेले पुरस्कार :**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | शतकाच्या उंबरठ्यावर | – | लक्ष्मीसेन भ्रष्टारक पुरस्कार, कोल्हापूर |
| २. | जाग | – | विमलाताई बेलसरे पुरस्कार, चांदूर |
| ३. | सोन्या | – | पद्मगंधा प्रतिष्ठान, नागपूर |
| ४. | साक्षीदार | – | यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचा बाबूराव बागूल पुरस्कार |
| ५. | साक्षीदार | – | कै. बाजीराव पाटील पुरस्कार, चांदूर |
| ६. | साक्षीदार (कथेस) | – | शामश्री पुरस्कार, इचलकरंजी |
| ७. | पाच मिनीटाची गोष्ट (कथेस) | – | श्रीपाद काळे पुरस्कार, सावंतवाडी |
| ८. | तीच माती तेच आकाश | – | परिवर्तनीय कथाकार पुरस्कार, कुरुंदवाड |
| ९. | शांते तू जिंकलीस | – | सह्यागिरी पुरस्कार, राधानगरी |
| १०. | शांते तू जिंगलीस | – | महाराष्ट्र राज्य साहित्य पुरस्कार |
| ११. | साहित्य अकादमी, दिल्ली, प्रभादेवी पुरस्कार (ए.आय.पी.सी.) | | |
| १२. | जैन साहित्य सेवा पुरस्कार, उस्मानाबाद | | |
| १३. | गोपीनाथ तळवळकर पुरस्कार | – | उत्कृष्ट दिवाळी अंक |
| १४. | जसं घडलं तसं | – | दीपा स्मृती पुरस्कार |
| १५. | मृत्युदंड | – | दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा पुरस्कार |

**समारोप**

नीलम माणगावे यांचा जीवन परिचय व त्यांच्या वाङ्.मयीन कामगिरीचा अभ्यास दुसऱ्या प्रकरणात केला गेला आहे. त्यांचे बालपण अत्यंत हलाखीच्या परिस्थितीतून गेले आहे. त्यांच्या आयुष्यातील बऱ्या, वाईट, अनुभवातून, घटना, प्रसंगातून त्यांचे व्यक्तिमत्त्व घडत गेले आहे. त्यातूनच त्यांचा जीवनविषयक दृष्टिकोन बनत गेला आहे.

नीलम माणगावे यांच्या आईनी त्यांना शिक्षणासाठी कोल्हापूरला पाठविले तसेच त्यांचा रमेश माणगावेंशी विवाह होणे ही त्यांच्या आयुष्यातील मोठी वळणं आहेत असे दिसते. 'साक्षीदार' या कथा संग्रहाला यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचा बाबूराव बागूल पुरस्कार, 'शांते तू जिंकलीस' या कथासंग्रहासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य पुरस्कार मिळाल्याने त्यांच्या लेखणीला देखील वळण मिळालेले दिसते. त्यांनी  समाज वाचला, समाजातील माणसे वाचली व त्याबद्दल चिंतन केलेले दिसते. त्यांच्यावर प्रभाव पाडणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचा आविष्कार त्यांच्या साहित्यात होताना दिसतो. आयुष्यात जे ठळक प्रसंग, घटना घडल्या, ज्या व्यक्ती त्यांच्या मनाला स्पर्श करून गेल्या, त्यांचे चित्रण त्यांच्या साहित्यात झालेले दिसते. त्यांचे जीवन, जीवनाविषयीचा दृष्टिकोन व त्यांचे साहित्य हे परस्परभिन्न नाही. त्यांनी कथा, कादंबरी, कविता, आत्मकथन, बालसाहित्य, लोकसाहित्य या साहित्यप्रकारात लेखन केलेले दिसते. जेवढ्या ताकदीने त्यांनी कथा लिहिल्या तेवढ्याच ताकदीने त्यांनी कादंबऱ्या लिहिलेल्या दिसतात.

नीलम माणगावे यांची काही पुस्तके प्रकाशनाच्या मार्गावर आहेत. एकत्र कुटुंबातील अन्यायग्रस्त स्त्रियांच्या मुलाखतीवर आधारीत स्त्री-जीवनविषयक केलेले सामाजिक लेखन 'माजघरातले हुंदके', समकालीन जैन समाज जीवनावरील कथासंग्रह, 'रथवादळ', 'ध्यास' तसेच 'जात्यात आणि सुपात' हे कवितासंग्रह, 'डॉली' यंत्रकथेवर आधारीत कादंबरी, 'अकुबाईचं तळं' हे कथासंग्रह, 'अंगणगाणी रिंगणगाणी', 'प्राणी लागले बोलायला', 'अवती भोवती' हे कवितासंग्रह तसेच 'कस्तुरगंध' नावाचे पुस्तकही प्रसिद्धीच्या मार्गावर आहेत.

नीलम माणगावे यांचे बालपण अनेक संकटाना सामोरे जात गेले. त्यांच्यावर आलेली संकटे, दु:खद प्रसंग, आनंदाचे क्षण इ. विषयीचे लेखन त्यांनी अत्यंत प्रांजळपणे आपल्या 'जसं घडलं तसं' या आत्मकथनात व्यक्त केले आहे. लक्ष्मीबाई टिळकांनी देखील आपले 'स्मृतिचित्र' हे आत्मचरित्र प्रांजळपणे, प्रामाणिकपणे लिहिलेले सर्वज्ञात आहे.

प्रिया तेंडूलकर, गौरी देशपांडे सारख्या लेखिका परदेशात राहिल्याने व त्यांच्याकडे अनुभवांची विशालता असल्याने त्यांच्या लेखनात परदेशी वातावरणाचे पेहरावाचे चित्रण येताना दिसते. माणगावे ग्रामीण भागात अधिक राहिल्याने त्यांच्या लेखनात ग्रामीण समाजाचे तेथील लोकांच्या जीवनपद्धतीचे चित्रण अधिक आलेले दिसते. त्यांनी आपल्या लेखनातून विधवा, विवाहित स्त्री, वेश्या, प्रौढ कुमारिका इ. चे प्रश्न मांडलेले आहेत. पण विभावरी शिरुरकर यांच्याएवढे त्यांना ते प्रभावीपणे मांडता आले नाहीत असे दिसते.

नीलम माणगावेनी यांनी आपल्या साहित्यातून समाजातील विविध प्रश्न मांडलेले आहेत. मतिमंद मुलांचा प्रश्न, बाल गुन्हेगारी, विधवा स्त्रियांचे दु:ख, वेश्यांचे दु:ख, पतीपत्नीचे नातेसंबंध इ. विषयांवर त्यांनी लेखन केलेले दिसते. ना. सी. फडकेंच्या मार्गाने जाणाऱ्या कमला फडके, नयना आचार्य, योगिनी जोगळेकर इ. लेखिकांप्रमाणे माणगावे प्रेमाचा त्रिकोण, प्रणयप्रसंग चित्रित करताना दिसत नाहीत तर सामाजिक जाणिवेतून समाजाला तारक-मारक गोष्टींना उठावदारपणा आणताना दिसतात. त्यांच्या लेखनात प्रणयचित्रण फारसे येत नाही. क्वचित आलेच तर त्या अतिशय संयमाने लिहिताना दिसतात.

## संदर्भ-सूची


१. माणगावे, नीलम : 'जसं घडलं तसं', श्रीपाद प्रकाशन, पुणे, प्र. आ. २००५, पृ. क्र. ८.

२. तत्रैव, पृ. क्र. १७८.

३. माणगावे, नीलम : 'साक्षीदार', मधुश्री प्रकाशन, प्र. आ. २००१, पृ क्र. २१.

४. माणगावे, नीलम : 'तीच माती तेच आकाश', मधुश्री प्रकाशन, प्र. आ. २००२, पृ. क्र. ११०.

५. माणगावे, नीलम : शांते तु जिंकलीस, सुमेरू प्रकाशन, पुणे, प्र. आ. २००२, पृ. क्र. १५१.

६. माणगावे, नीलम : ज्वालामुखीच्या तोंडावर, निर्मोही प्रकाशन, पुणे, प्र. आ. २००७, पृ. क्र. १५५.

७. माणगावे, नीलम : डायरी, मनोदय प्रकाशन, पुणे, प्र. आ. १९९७, पृ. क्र. १६८.

८. माणगावे, नीलम : जिद्द, मधुश्री प्रकाशन, पुणे, प्र. आ. १९९८, पृ. क्र. २२१.

९. माणगावे, नीलम : सोन्या, मनोदय प्रकाशन, पुणे, प्र. आ. १९९९, पृ. क्र. २०१.

१०. माणगावे, नीलम : जसं घडलं तसं, (मनोगत) श्रीपाद प्रकाशन, पुणे.

११. तत्रैव, पृ. क्र. १९२.

१२. माणगावे, नीलम : शतकाच्या उंबरठ्यावर, मनोदय प्रकाशन, पुणे, प्र. आ. २००१, (आश्विनी धोंगडे यांची प्रस्तावना)

१३. माणगावे, नीलम : जाग, सैनिक प्रकाशन, प्र. आ. २००१ (माया पंडीत प्रस्तावना)




BARR BALASAHEB ... LIBRARY